दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता
vadalvartanews@gmail.com
संपादक : अजय भांगे
https://epaper.vadalvarta.com
बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी • सोमवार दि.२२ डिसेंबर २०२५ • 9422660077 • आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ • वर्ष ३ रे • अंक १२० • पाने ४ • किंमत ४ रुपये
Beed (Mahmar) Daily Marathi • Monday 22 December 2025 • 9422660077 • RNI-MAHMAR / 2023 / 87555 • Year - 3rd • Issue 120 • Pages 4 • Rate 4 Rs

### शरद पवार यांच्या राष्ट्रवादीसोबत एकत्र लढणार का?

**मुंबई**–आगामी महानगरपालिका निवडणुकीत शरद पवार यांच्या राष्ट्रवादीसोबत एकत्र लढणार का? या प्रश्नावर बोलताना त्यांनी स्थानिक परिस्थितीचे महत्त्व अधोरेखित केले. आम्ही महायुतीत असलो तरी आमच्या कार्यकर्त्यांना जास्तीत जास्त संधी मिळावी, असे आम्हाला वाटते. भाजप आणि शिवसेनेलाही त्यांच्या कार्यकर्त्यांना संधी द्यायची आहे, म्हणूनच काही ठिकाणी आम्ही एकमेकांविरोधात लढलो. शेवटी मतांची विभागणी झाली की निकाल फिरतात. त्यामुळे आगामी निवडणुकीत तिथले शहराध्यक्ष आणि जिल्हाध्यक्ष राजकीय परिस्थिती पाहून निर्णय घेतील, असे त्यांनी स्पष्ट केले.अजित पवारांनी आपल्या भाषणातून भविष्यातील हेतू स्पष्ट केला. राज्यातील २९ महानगरपालिकांमध्ये आमचा महापौर व्हावा, अशी आमची इच्छा आहे. त्यादृष्टीने आम्ही सध्या पुण्यात चाचपणी करत आहोत. कार्यकर्त्याला ताकद देऊन शहरांच्या विकासासाठी राष्ट्रवादी काँग्रेस कटिबद्ध असेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

# नगर पंचायत, नगर पालिका निवडणुकीत महायुतीचा वरचष्मा!

### निकाल नगध्यपदाचे खालील प्रमाणे



जामखेड : नगराध्यक्षपदासाठी भाजपच्या उमेदवार प्रांजल आमित चिंतामणी विजयी
शेवगाव : नगराध्यक्षपदी शिंदेंसेनेच्या माया मुंडे विजयी
राहुरी : नगराध्यक्षपदी विकास आघाडीचे भाऊसाहेब मोरे विजयी
कोपरगाव : नगराध्यक्षपदी भाजपचे पराग संधान विजयी
नेवासा : नागराध्यक्षपदी शिवसेना शिंदे गट करणसिंह घुले विजयी
अमरावती जिल्हा : नगराध्यक्ष पदाचे विजयी उमेदवार
धामणगाव रेल्वे – भाजपच्या अर्चना अडसड रोठे विजयी
दर्यापूर – काँग्रेसच्या मंदाकिनी भारसाकडे विजयी
अचलपूर – भाजप रूपाली माथने विजयी
मोर्शी –शिवसेना शिंदे गट प्रतीक्षा गुल्हाने विजयी
नांदगाव खंडेश्वर – शिवसेना ठाकरे गट प्राप्ती मारोडकर विजयी
चिखलदरा – काँग्रेसचे शेख अब्दुल शेख हैदर विजयी
धारणी नगरपंचायत भाजपचे सुनील चौथमल विजयी
चांदूर रेल्वे – बहुजन वंचित आघाडीच्या प्रियंका विश्वकर्मा विजयी
वरूड – भाजपचे ईश्वर सलामे विजयी
शेंदूरजना घाट –भाजपच्या सुवर्णा वरखेडे विजयी
अंजनगाव सुर्जी – भाजपचे अविनाश गायगोले विजयी
चांदूर बाजार – बच्चू कडू यांच्या प्रहारच्या मनीषा नांगलिया विजयी
कोल्हापूर जिल्हा
पन्हाळा नगरपरिषद : नगराध्यक्षपदी जन सुराज्य शक्ती पक्षाच्या जयश्री प्रकाश पवार (तोरसे)
जयसिंगपूर नगरपरिषद : नगराध्यक्षपदी राजर्षी शाहू विकास आघाडीचे संजय शामगोंडा पाटील–यड्रावकर
कुरुंदवाड नगरपरिषद : नगराध्यक्षपदी राजर्षी शाहू विकास आघाडीच्या मनीषा उदय डांगे
हुपरी नगरपरिषद : नगराध्यक्षपदी भारतीय जनता पार्टीचे मंगलराव जिनाप्पा मालगे
शिरोळ नगरपरिषद : नगराध्यक्षपदी शिव शाहू विकास आघाडीच्या योगिता सतिश कांबळे

## घराणेशाहीचा जोर



### घराणेशाहीचा जोर

या निवडणुकांमघध्येही घराणेशाहीचा जोर दिसून आला. घराणेशाही जोपासण्यात आणि आपल्या शहराची सत्ता आपल्या ताब्यात ठेवण्यासाठी आमदार, मंत्र्यांनी स्वतःच्याच नातेवाईकांना उमेदवारी दिल्याचे समोर आले. यात पहिलं मोठं नाव म्हणजे भाजपचे मंत्री गिरीश महाजन यांचं आहे. गिरीश महाजन यांनी त्यांची पत्नी साधना महाजन यांना नगराध्यक्षपदाची उमेदवारी दिली. विशेष म्हणजे त्या बिनविरोध नगराध्यक्षपदी निवडून देखील आल्या. मंत्री हसन मुश्रीफ यांच्या सून सेहरनिदा मुश्रीफ या कागल नगरपालिकेतून नगराध्यपदासाठी बिनविरोध निवडून आल्या. भाजपचे मंत्री जयकुमार रावल यांच्या आई नयनकुंवर रावल या धुळे जिल्ह्यातील दोंडाईचा नगरपलिका निवडणुकीत नगराध्यक्षपदासाठी बिनविरोध निवडून आल्या. इथे भाजपचे सगळे नगरसेवक बिनविरोध निवडून आले आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे मामेभाऊ अल्हाद कलोती हे चिखलदरा नगरपरिषदेच्या नगरसेवक पदासाठी निवडणूक लढवत होते. त्यांच्याविरोधात उभ्या असलेल्या सगळ्या उमेदवारांनी माघार घेतली. त्यानंतर ते बिनविरोध निवडून आले.भुसावळचे भाजप आमदार आणि मंत्री संजय सावकारे यांनी सुद्धा पत्नी रजनी सावकारे यांना नगराध्यक्षपदासाठी मैदानात उतरवलं होतं. आदिवासी विकास मंत्री अशोक उईके यांनी त्यांच्या मुलीला यवतमाळ नगरपालिकेच्या निवडणुकीसाठी रिंगणात उतरवलं. त्यांची मुलगी प्रियदर्शनी उईके नगराध्यक्षपदासाठी निवडणूक लढवली, त्यांच्याविरोधात माजी मंत्री शिवाजीराव मोघे यांची सून प्रियंका मोघे निवडणुकीच्या रिंगणात उभ्या होत्या. राष्ट्रवादीचे राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांच्या पत्नी मोहिनी नाईक या सुद्धा यवतमाळ जिल्ह्यातील पुसद नगरपालिकेच्या नगराध्यक्षपदासाठी उभ्या राहिल्या. याआधीही नाईक घराण्याकडे नगराध्यक्षपद होतं.
भाजपचे मंत्री आकाश फुंडकर यांच्या वहिनी अपर्णा फुंडकर यांना खामगाव नगरपालिकेच्या निवडणुकीत नगराध्यक्षपदासाठी तिकीट मिळालं. त्या पहिल्यांदाच निवडणुकीच्या रिंगणात उभ्या राहिल्या.

### जनतेने दाखवून दिले–धनंजय मुंडे

**बीड जिल्ह्यात महायुतीचा वरचष्मा असल्याचं दिसून आलं. परळी नगर परिषद निवडणुकीत पुन्हा एकदा जनतेने विश्वास दाखवल्याचं धनंजय मुंडेंनी म्हटलं आहे. खासदार तळ ठोकून राहिले काय आणि कायमही राहिले काय पण जनतेने सर्वांना दाखवून दिलं, असं मुंडेंनी म्हटलं.**

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचे निकाल रविवारी (२१ डिसेंबर) समोर आले. राज्यातील एकूण २४६ नगर परिषदा आणि ४२ नगर पंचायतींसाठी मतमोजणी रविवारी झाली. या निवडणुकीत महायुतीनं महाविकास आघाडीला पछाडल्याचं चित्र निकालावरून पाहायला मिळत आहे. देवेंद्र फडणवीस यांनी रात्री केलेल्या सोशल मीडिया पोस्टमध्ये महायुतीनं २१५ नगर पालिकांमध्ये विजय मिळवला असल्याचा दावा केला आहे. त्यापैकी भाजपनं १२९ जागा मिळवल्या असल्याचं त्यांनी म्हटलं आहे. महायुतीनं एकूण जागांपैकी जवळपास ७५ टक्के जागा जिंकल्याचं फडणवीस यांनी म्हटलं आहे. राज्य निवडणूक आयोगाने राज्यातील २८८ नगरपरिषदा व नगर पंचायत निवडणुकांचा कार्यक्रम ४ नोव्हेंबरला जाहीर केला होता.त्यानुसार पहिल्या टप्प्यात २ डिसेंबरला २६३ नगरपरिषदा व नगरपंचायतींसाठी मतदान झाले होते. २० डिसेंबरला दुसऱ्या टप्प्यातील उर्वरित २३ नगरपरिषद आणि नगरपंचायतीसाठी मतदान झाले. तसेच १४३ सदस्य जागांसाठी मतदान प्रक्रिया पार पडली. तर, आज मतमोजणीनंतर चित्र स्पष्ट होत आहे. या निवडणुकीच्या अनुषंगाने महायुतीतील भाजप, शिवसेना आणि अजित पवार गट अनेक ठिकाणी एकमेकांविरोधात लढले. यावेळी बऱ्याच ठिकाणी वाद आणि तक्रारी पाहायला मिळाल्या.

**कुणाला किती जागा?**

मलकापूर नगर परिषद – मलकापूर नगरपरिषदेत जन सुराज्य शक्ती पक्षाचं वर्चस्व. जन सुराज्यच्या रश्मी शंतनु कोठावळे या नगराध्यक्षपदी निवडून आल्या आहेत. त्यांना २२६५ मते पडली. या ठिकाणी जागांपैकी जन सुराज्य पक्षाला ११ जागा पडल्या, उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाला ७ जागा, भाजपला १ जागा तर १ जागा अपक्षाला पडली.

जेजुरी नगर परिषद – जेजुरी नगर परिषदेत नगराध्यक्ष पदाचे राष्ट्रवादी काँग्रेसचे बारभाई जयदीप दिलीप विजयी झाले आहेत. त्यांना ७३०४ मतं मिळाली.
चंदगड नगरपंचायत – चांदवड नगरपंचायतीत भाजपचे कानेकर सुनिल सुभाष विजयी ठरले आहेत. त्यांना ३९६७ मतं पडली. या नगरपंचायतीतील एकूण १७ जागांपैकी ८ जागा भाजप, ८ जागा राजर्षी शाहू आघाडी तर १ जागा अपक्षाने जिंकली.
सांगली जिल्ह्यात नगर परिषदेच्या ६ जागा आणि नगर पंचायतीच्या २ अशा एकूण ८ जागांपैकी २ जागा भाजप, २ शिवसेना, शरद पवार गट – २, १ काँग्रेस आणि १ स्थानिक विकास आघाडीने जिंकली. त्यानुसार –
ईश्वरपूर नगरपरिषद राष्ट्रवादी शरद पवार गटाचे आनंदराव मलगुंडे विजय
आष्टा नगरपरिषद राष्ट्रवादी शरद पवार गटाचे विशाल शिंदे विजयी
तासगाव नगरपरिषद स्वाभिमानी विकास आघाडीच्या विजया सावंत विजयी
पलूस नगरपरिषद काँग्रेसच्या संजीवनी पूदाले विजयी
विटा नगरपरिषद शिवसेना शिंदे गटाचे काजल म्हेत्रे विजयी
जत नगरपरिषद भाजपाचे रवींद्र आरळी विजयी.
आटपाडी नगरपंचायत भाजपाचे उत्तम जाधव विजयी
शिराळा नगरपंचायत शिवसेना शिंदे गटाचे पृथ्वीसिंग नाईक विजयी
खेड नगरपरिषदेत महायुतीची एकहाती सत्ता
खेड नगरपरिषद निवडणुकीत महायुतीने २१–० असा ऐतिहासिक व एकतर्फी विजय मिळवत एकहाती सत्ता प्रस्थापित केली आहे. या निकालात महायुतीने सर्वच्या सर्व जागांवर निर्विवाद वर्चस्व सिद्ध केले. या निवडणुकीत शिवसेनेचे १७ उमेदवार विजयी, तर भाजपचे ३ उमेदवार विजयी झाले.
उरण नगरपरिष – उरण नगरपरिषदेच्या नगराध्यक्षपदाच्या



निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या उमेदवार भावना घाणेकर विजयी.
ब्रह्मपुरी नगरपरिषद – काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी ब्रह्मपुरीचा गड राखला. वडेट्टीवार यांच्या ब्रह्मपुरी नगरपरिषदेत काँग्रेसचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार योगेश मिसार विजयी झाले. यावेळी गुलाल उधळून विजय जल्लोष करण्यात आला.
चांदुर रेल्वे (अमरावती) – नगराध्यक्ष पदासाठी वंचित बहुजन आघाडीच्या सौ.प्रियंकाताई निलेश विश्वकर्मा विजयी.
संगमनेर नगरपरिषद – महाराष्ट्र राज्यात सर्वाधिक म्हणजेच तब्बल १६, ६४४ मतांच्या मताधिक्याने संगमनेरच्या नगराध्यक्षपदी डॉ. मैथिली तांबे यांचा विजय झालाय, तसेच ३० पैकी २७ नगरसेवकही निवडून आलेत.
आमदार सत्यजीत तांबे यांनी एक्सवर याबाबत पोस्ट शेअर करत संगमनेरकरांचे आभार मानले आहेत.
काटोलमधून राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार गट व शेकापच्या उमेदवार अर्चना देशमुख २०५० मतांनी विजयी झाल्या.

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी – शरदचंद्र पवार व शेकाप –१२ भाजपा – १३

**घराणेशाही नाही, असं म्हणणाऱ्या पक्षाची स्थिती**

भाजपमध्ये घराणेशाही नाही असा दावा भाजप नेते नेहमीच करतात. पण, आता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत मात्र भाजपच्या मंत्र्यांच्या पत्नी, सुना आणि नातेवाईकांना तिकीट मिळालं. यामध्ये भाजपसह इतर पक्षांचे आमदारही मागे नसल्याचं चित्र दिसून आलं.
१. अमरावती जिल्ह्यातील दर्यापूर नगर परिषद निवडणुकीत भाजपचे आमदार प्रकाश भारसाकळे यांनी पत्नी नलिनी भारसाकळे यांना नगराध्यक्षपदाची उमेदवारी दिली. त्यांच्याविरोधात काँग्रेसने आमदार भारसाकळे यांचे भाऊ सुधाकर भारसाकळे यांच्या पत्नी मंदाकिनी भारसाकळे यांना उमेदवारी दिली. म्हणजे एकाच घरात दोन उमेदवार असं चित्र होतं.
२. धामणगाव रेल्वे नगरपरिषदेसाठी भाजप आमदार प्रताप अडसड यांची बहीण अर्चना रोठे यांना नगराध्यक्षपदासाठी भाजपची उमेदवारी मिळाली.
३. भाजप आमदार मंगेश चव्हाण यांच्या पत्नी प्रतिभा चव्हाण यांना भाजपनं चाळीसगाव नगरपालिकेसाठी नगराध्यक्षपदाचे तिकीट दिले होते.
४. धुळे जिल्ह्यातील शिरपूर नगरपरिषदेसाठी भाजप आमदार अमरीश पटेल यांचे चिंरजीव चिंतन पटेल यांना भाजपनं नगराध्यक्षपदाची उमेदवारी दिली होती.
५. सोलापूर जिल्ह्यातील अक्कलकोट येथील भाजप आमदार सचिन कल्याणशेट्टी यांचे भाऊ मिलन कल्याणशेट्टी यांना तिकीट मिळाले.
६. भाजप आमदार हरीश पिंपळे यांचे मोठे बंधू भूपेंद्र पिंपळे यांना भाजपनं मूर्तिजापूर नगरपरिषदेतून नगरसेवक पदासाठी तिकीट दिले.

## मानवत ते तिरुपती सायकल प्रवास यात्रेकरूंचा नायगाव नगरपंचात उपाध्यक्ष विजय पाटील चव्हाण व अक्षय पाटील चव्हाण यांच्या वतीने सत्कार



दैनिक वादळ वार्ता
**नायगाव । प्रतिनिधी**

नांदेडच्या नायगाव शहरातील नगरपंचायत चे नगर उपाध्यक्ष श्री विजय पाटील चव्हाण व सामाजिक कार्यकर्ते अक्षय पाटील चव्हाण यांच्या वतीने आज दिनांक २० डिसेंबर रोजी नायगाव नगरपंचायत येथे मानवत ते तिरुपती बालाजी असा एक हजार एक किलोमीटरचा सायकल सायकल प्रवास करणाऱ्या यात्रेकरूंचा सत्कार करून त्यांना भोजन निवासाची व्यवस्था व आर्थिक केली गेल्या पाच वर्षापासून ची अखंड परंपरा जोपासत चव्हाण परिवाराने राजकीय क्षेत्रासोबत धार्मिकतेची जोड देत संस्कृतीची जतन करत धार्मिक कार्यात नगर उपाध्यक्ष विजय पाटील चव्हाण व अक्षय पाटील चव्हाण यांनी अग्रेसर असतात यावेळी नायगाव नगरपंचायत अध्यक्ष प्रतिनिधी संजय पाटील चव्हाण नगरपंचायत गटनेते सुधाकर पाटील शिंदे श्रीनिवास पाटील शिंदे यास यासह नागरिक उपस्थित होते.

## अंबाजोगाई येथे पंकजाताई मुंडे यांची विजयी नगराध्यक्ष नंदकिशोर मुंदडा व कार्यकर्त्यांची सदिच्छा भेट

### विजयाचा आनंद द्विगुणीत करणारे प्रेरणादायी केले मार्गदर्शन

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**



अंबाजोगाई नगरपरिषद निवडणुकीत बहुमताने विजय संपादन करणारे नवनिर्वाचित नगराध्यक्ष आदरणीय नंदकिशोरजी (काकाजी) मुंदडा तसेच सर्व विजयी नगरसेवक यांचा आज पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री, लोकनेत्या पंकजाताई गोपीनाथरावजी मुंडे यांनी अंबाजोगाई येथील आई निवास येथे स्नेहपूर्ण भेट घेऊन अभिनंदन केले.
या प्रसंगी पंकजाताईंनी विजयी उमेदवारांचे मनःपूर्वक कौतुक करताना सांगितले की, हा विजय जनतेच्या विश्वासाचा कौल आहे. अंबाजोगाई शहराच्या सर्वांगीण विकासासाठी पारदर्शक,लोकाभिमुख आणि गतिमान प्रशासन देणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. त्यांनी नगरपरिषदेच्या माध्यमा तूनस्वच्छता, पाणीपुरवठा, रस्ते,आरोग्य,पर्यावरण संवर्धन तसेच पशुसंवर्धन यांच्या संबंधित योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यावर विशेष भर दिला.पंकजाताईंनी पुढे बोलताना संघटनात्मक एकोपा जपण्याचे,सर्व सामान्य नागरिकांच्या समस्या प्राधान्याने सोडवण्याचे व शासनाच्या विविध विकास योजना तळागाळातील नागरिका पर्यंत पोहोचवण्याचे आवाहन केले.त्यांच्या प्रेरणादायी मार्गदर्शनामुळे उपस्थितांमध्ये नवचैतन्य संचारले असून विजयाचा आनंद द्विगुणीत झाल्याचे चित्र दिसून आले.या भेटी दरम्यान नमिताताई अक्षय मुंदडा यांच्यासह पदाधिकारी,कार्यकर्ते व समर्थक मोठ्या संख्येने उपस्थित होते.सर्वांनी मिळून शहराच्या विकासा साठी एकत्रितपणे काम करण्याचा निर्धार व्यक्त केला.ही भेट अंबाजोगाई च्या राजकीय,सामाजिक जीवनात नवे पर्व सुरू करणारी ठरेल,असा विश्वास उपस्थित नागरिकांनी व्यक्त केला.

संपादकीय

# नारळ लागवडीतून कोकणच्या अर्थव्यवस्थेला बळ

समुद्रकिनारी असलेल्या नागरिकांनी जास्तीत जास्त नारळाची लागवड करावी. यामुळे नारळ प्रक्रिया उद्योगाला चालना मिळून स्थानिक लोकांना रोजगार मिळणार आहे. ज्यामध्ये शेतकऱ्यांना जोडधंदा मिळणार आहे. कामगारांच्या रिकाम्या हातांना काम मिळणार आहे. नारळ विक्रीमुळे व्यापारी वर्ग निर्माण होणार असून नवनवीन नारळ उद्योजक निर्माण होणार आहेत. त्यामुळे कोकणची वेगळी ओळख जगात होणार आहे.

जगामध्ये जवळजवळ ९३ देश नारळाचे उत्पादन घेतात. आपल्या महाराष्ट्र राज्यात नारळ उत्पादनाचा विचार करता राज्यात ३३ हजार हेक्टरवर नारळाचे लागवडीखाली क्षेत्र असून १७ हजार ९२९ हेक्टर सर्वाधिक क्षेत्र सिंधुदुर्ग जिल्ह्यात आहे, तर कोकणात दरवर्षी अंदाजे नारळाचे रुपये १८.६३ कोटींचे उत्पादन होत असून सिंधुदुर्ग जिल्ह्यात रुपये १ हजार ४५७ लाख नारळाचे उत्पादन होत असते. ही माहिती प्रादेशिक नारळ संशोधन केंद्राचे कृषी विद्यावेत्ता डॉ. किरण मालशे यांनी २०२३ साली दिली होती. म्हणजे अजून चांगल्या प्रकारे नारळाची लागवड केल्यास नारळाच्या उत्पादनात वाढ होऊन कोकणच्या अर्थव्यवस्थेला अधिक बळ मिळेल.


आज नारळाचा विचार केल्यास नारळाच्या उत्पादनात घट होऊन नारळाच्या किमती जवळजवळ तिप्पट झालेल्या दिसत आहेत. तर नारळाच्या तेलाची किंमत रुपये ६०० प्रति लिटर झाली आहे. याला कारण रोगराई, बदलते हवामान, अपुरे पाणी आणि माकडांचा वावर होय. असे असले तरी कोकणात चांगले नारळाचे उत्पादन होते. तेव्हा नारळ उत्पादनाकडे व्यवसायाच्या दृष्टीने पाहिल्यास उत्तम प्रकारे बळ कोकणच्या अर्थव्यवस्थेला मिळू शकते. त्यासाठी योग्य प्रकारे नारळाची लागवड करायला हवी. म्हणजे नारळाच्या उत्पादनात वाढ झाल्यामुळे कोकणच्या उत्पन्नात अधिक चांगल्याप्रकारे वाढ होऊ शकते. तेव्हा नारळ कितीही महाग झाला तरी कोकणी माणूस खोबऱ्याशिवाय जेवण करीत नाही. नारळाचा विचार केल्यास अनेक लोकांचा संसार नारळाच्या व्यवसायावर अवलंबून असतो. सध्यातरी हा व्यवसाय कोकणात शेतकऱ्यांचा पूरक जोडधंदा म्हणून ओळखला जातो. काही शेतकरी शेतीच्या बाजूने नारळाची रोपे लावतात. काहींची तर नारळाची स्वतंत्र बाग आहे. एक माड जरी असला तरी त्याचा अनेक प्रकारे उपयोग होऊ शकतो. तेव्हा नारळाच्या व्यवसायामुळे अनेक रोजगाराच्या संधी उपलब्ध होत आहेत. त्यासाठी नारळाची अधिक प्रमाणात लागवड करणे गरजेचे आहे. आपण नारळ जरी म्हणालो असलो तरी त्याच्या विविध भागांचा उपयोग नागरिकांच्या उपयोगासाठी होत असतो. त्यामुळे नारळाच्या झाडाला 'कल्पवृक्ष' म्हणतात. असे आपण प्राथमिक शाळेत शिकलो आहोत. तेव्हा नारळाच्या झाडाचे योग्य प्रकारे संगोपन आपल्याला करावे लागेल. कारण त्याच्या प्रत्येक भागाचा उपयोग वेगवेगळ्या प्रकारे केला जातो. आता आपण नारळाच्या झाडांच्या विविध भागांचा उपयोग कसा केला जातो किंवा नागरिकांना होतो याविषयी माहिती घेऊ. त्यामुळे नारळाच्या झाडाला खऱ्या अर्थाने कल्पवृक्ष म्हणतात हे वाचक वर्गाच्या लक्षात येईल.घाटमाथ्यावर आवडीने शेंगदाणे जेवणात वापरतात त्याप्रमाणे कोकणात ओल्या खोबऱ्याचा जेवणात वापर केला जातो. कोवळ्या नारळाचे पाणी लोक आवडीने पितात. कोकणात त्याला शहाळे असेही म्हणतात. खोबऱ्यापासून तेल व दुधसुद्धा तयार करतात. तेल काढल्याने सुखी पेंडसुद्धा मिळते. करवंटीचा वापर डवली व कोळशासाठी केला जातो. नारळ सोलल्यानंतर त्यांची सोडणा मिळतात ती पाण्यात फुगत घातली जातात. त्यानंतर त्याचा काथ्या तयार केला जातो. त्यापासून दोरी, ब्रश, जाळी, चटई इत्यादी वस्तू तयार केले जातात. नारळाच्या पानापासून सुंदर छप्पर किंवा जाळी बनवली जातात. त्याच्या हिरापासून झाडू बनवितात. हिराच्या झाडूलासुद्धा बाजार पेठेत बऱ्यापैकी मागणी असते. नारळाचे जे खोड असते त्यापासून घरासाठी वासे तयार केले जात असून आकर्षक फर्निचरसुद्धा तयार करतात. कोकणात खाडीशेजारी जी बैठी घरे आहेत त्यांना सर्रास माडाचे वासे दिसतील. खारी हवा असल्यामुळे वासेसुद्धा जास्त दिवस टिकतात. तेव्हा नारळाचा विचार केल्यास शेतकऱ्यांसाठी उपयुक्त शेतीला जोडधंदा आहे. तसेच उपजीविकेचे प्रमुख साधन आहे असे म्हणावे लागेल.कोकणात नदी-नाल्यांच्या कडेला, खाडी व समुद्राच्या काठावर डोलणारी नारळाची झाडे दिसतील तशी त्याची काळजीसुद्धा घेतली जाते. विशेष म्हणजे खारी हवा नारळाला पोषक असते. समुद्र किंवा खाडीच्या कडेला जी नारळाची झाडे डोलताना पाहिल्यावर कल्पना येते. तेव्हा सध्याच्या काळात नारळाची किंमत विचारात घेता नारळाची लागवड करणे फायदेशीर ठरणार आहे. नारळाच्या बटू व उंच जातीचा विचार केल्यास बटू जात ३ ते ५ वर्षांत, तर उंच जाती ५ वर्षांनंतर नारळ धरायला लागतात. बटू नारळाला कमी, तर उंच नारळाला जास्त आयुष्य असते. माडाला नारळ लागल्यावर जवळजवळ ९ महिन्यांत नारळ परिपक्व होतात. मात्र त्या आधी सुद्धा नारळ काढू शकतो. जमीन, योग्य खत, पाणी आणि माडाची काळजी घेतल्यास नारळाचे उत्पादन वाढण्याला मदत होते. आज जे शेतकरी संकटात आहेत त्यांनी नारळाची लागवड बिनधास्तपणे करावी. आजच्या घडीला कोकणात शेतकऱ्यांसाठी उत्पन्नाचे प्रमुख साधन आहे.समुद्र किनारी असलेल्या नागरिकांनी जास्तीत जास्त नारळाची लागवड करावी. यामुळे नारळ प्रक्रिया उद्योगाला चालना मिळून स्थानिक लोकांना रोजगार मिळणार आहे. ज्यामध्ये शेतकऱ्यांना जोडधंदा मिळणार आहे. कामगारांच्या रिकाम्या हातांना काम मिळणार आहे. नारळ विक्रीमुळे व्यापारी वर्ग निर्माण होणार असून नवनवीन नारळ उद्योजक निर्माण होणार आहेत. त्यामुळे कोकणची वेगळी ओळख जगात होणार आहे. त्यासाठी केवळ घरापुरते नारळाचे उत्पादन न करता व्यावसायिक दृष्टिकोनातून नारळाच्या उत्पादनाकडे कोकणवासीयांनी पाहावे. तसेच शासन स्तरावर नुकसानग्रस्त नारळ बागायतदारांना योग्य सुरक्षा विमा कवच आणि नारळ प्रक्रिया उद्योगांना प्रोत्साहन वेळीच दिले गेले पाहिजे. त्यामुळे नारळ लागवडीतून कोकणच्या अर्थव्यवस्थेला अधिक बळ मिळेल हे मात्र निश्चित.

# पिकपाहणी शेतकऱ्यांच्या हिताची २१ डिसेंबर पासून रब्बीची ई पीक पाहणी करा-प्रा.बबनराव आंधळे

दैनिक वादळ वार्ता

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यात सध्या ई-पीक पाहणी डिजिटल क्रॉप सर्वे (डी.सी.एस) ग्रीस्टॅग आणि फार्मर आयडी या शासकीय उपक्रमाची मोठी लगबग सुरू झाली असून ही मोहीम केवळ कागदोपत्रीच मर्यादित न राहता थेट शेतकऱ्यांच्या हिताशी जोडलेली असल्याचे स्पष्ट होत आहे महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागा मार्फत ग्रीस्टॅग संकल्पने अंतर्गत राबविण्यात येत असलेल्या ई-पीक पाहणी या मोहिमेमुळे भविष्या तील पीक विमा अनुदान, नैसर्गिक आपत्ती मदत, नुकसान भरपाई,आणि विविध कृषी योजना थेट पिकाच्या नोंदीशी संलग्न होणार आहेत. जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या मार्गदर्शना खाली जिल्हा प्रशासन शेतकऱ्यांना वेळेवर बी- बियाणे खते अनुदान योजना आणि पीक विम्याचा लाभ मिळावा यासाठी सातत्याने दक्ष राहून काम करीत आहे विविध आराखड्याचा आढावा क्षेत्रीय पाहणी आणि अधिकाऱ्यांशी नियमित समन्वय साधत जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन हे शेतकरी केंद्रस्थानी ठेवून निर्णय घेत असल्याचे चित्र जिल्ह्यात दिसून येत आहे राज्य शासनाच्या दिनांक १४ ऑक्टोबर २०२४ च्या पत्रान्वये ई-पिक पाहणी डिजिटल क्रॉपसर्वे (डी.सी.एस) मोबाईल पच्या माध्यमातून राबविण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. त्यानुसार ई-पिक पाहणी प्रक्रिया सुरू करण्यात आली असून शेतकरी स्तरावर तसेच सहाय्यक स्तरावर स्वतंत्र कालावधी निश्चित करण्यात आला आहे.शासन निर्देशानुसार शेतकरी स्तरावरील पीक पाहणीसाठी कालावधी दिनांक २१ डिसेंबर २०२५ ते २४ जानेवारी २०२६ असा निश्चित करण्यात आला आहे या कालावधीत शेतकऱ्यांनी स्वतः किंवा सहाय्यक यंत्रणेच्या मदतीने आपल्या पिकाची अचूक नोंदणी करणे अपेक्षित आहे त्यानंतर सहाय्यक स्तरावरील म्हणजेच महसूल कृषी अधिकारी आणि ग्राम विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यां साठी कालावधी दिनांक २५ जानेवारी २०२६ ते २० मार्च २०२६ असा निश्चित करण्यात आला आहे या कालावधीत १००% ई-पिक पाहणी पूर्ण करण्याचे स्पष्ट आदेश देण्यात आले आहेत.या पार्श्वभूमीवर निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी बीडच्या उपविभागीय अधिकारी कविता जाधव तसेच सर्व तहसीलदार यांनी संयुक्तपणे आढावा घेतला राज्यात एकूण झालेल्या ई-पिक पाहणीचा विचार करता बीड जिल्ह्याचा सध्या १४ वा क्रमांक असून हा क्रमांक अधिक



सुधारण्यासाठी महसूल विभाग पूर्ण क्षमतेने काम करीत आहे शेतकऱ्यांनी फार्मर आयडी काढणे अत्यंत आवश्यक असून भविष्यातील सर्व शासकीय लाभ थेट फार्मर आयडी आणि ईपीक पाहणी जोडले जाणार आहेत ही बाब लक्षात घेऊन तहसीलदार साहेब यांनी स्पष्ट आदेश काढत महसूल यंत्रणेला अधिक सक्रिय करण्याचे निर्देश दिले.नायब तहसीलदार,मंडळ अधिकारी,तलाठी,ग्राम महसूल सेवक यांनी गावोगावी प्रत्यक्ष फिरून ई-पिकपाहणी पूर्ण करावी असे आदेश देण्यात आले आहेत यासंदर्भात जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन साहेब यांनी आवाहन केले आहे की,ई-पिकपाहणी ही केवळ सरकारी औपचारिकता नसून शेतकऱ्यांच्या हक्काचे संरक्षण करणारी प्रक्रिया आहे अचूक पीक नोंद झाल्यास दुष्काळ, अतिवृष्टी,गारपीट, यासारख्या नैसर्गिक आपत्तीच्या काळात शेतकऱ्यांना मदत वेळेवर मिळू शकते त्यामुळे प्रत्येक शेतकऱ्यांनी ई-पिक पाहणी आणि फार्मर आयडी नोंदणी पूर्ण करावी अप्पर जिल्हाधिकारी यांनी सांगितले की,शासनाच्या सर्व कृषी योजना अनुदान आणि विमा भविष्यात पूर्णपणे डिजिटल प्रणाली वर आधारित असणार आहेत त्यामुळे शेतकऱ्यांनी कोणतीही शंका न बाळगता महसूल यंत्रणेला सहकार्य करावे निवासी उपजिल्हाधिकारी यांनी क्षेत्रीय पातळीवर काम वेगाने सुरू केले असून उर्वरित प्रकरणे ठरवून दिलेल्या कालावधीत पूर्ण केली जातील अशी माहिती दिली आहे बीड जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्याच्या तहसीलदार साहेबांनी शेतकऱ्यांना थेट शब्दात सांगितले की ई-पिक पाहणी ही शेतकऱ्यांच्या हिताची आहे आज थोडा वेळ दिल्यास उद्या मोठा फायदा होईल महसूल विभागातील अधिकारी व कर्मचारी तसेच गावोगावी फिरत आहेत त्यामुळे शेतकऱ्यांनी सहकार्य करावे आणि ग्रीस्टॅग प्रकल्पांतर्गत फार्मर आयडी काढून घ्यावा शासन प्रशासन आणि शेतकरी या तिघांच्या समन्वयातूनच ही मोहीम यशस्वी होणार असून डिजिटल पीक पाहणीच्या माध्यमातून शेतकऱ्यांचे भवितव्य अधिक सुरक्षित करण्याचा हा प्रयत्न असल्याचे चित्र सध्या जिल्ह्यात दिसून येत आहे त्यामुळे ग्रामीण युवक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष तथा बीड जिल्हा सहकार बोर्डाचे संचालक प्राध्यापक बबनराव आंधळे यांनी बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी ई-पीक पाहणी लवकरात लवकर करून घ्यावी असे आवाहन बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांना एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.

## ६१ वी पुरुष-महिला राज्य अजिंक्यपद खो-खो स्पर्धा

# महिलांमध्ये धाराशिव वि.पुणे तर पुरुषांमध्ये पुणे वि.मुंबई उपनगर अंतिम फेरीत भिडणार

## पुण्याचे दोन्ही संघ अंतिम फेरीत; बीडमध्ये अंतिम थरार शिगेला

दैनिक वादळ वार्ता

**बीड । प्रतिनिधी**

बीड येथील श्रीमती योगी छत्रपती शिवाजी महाराज क्रीडा संकुलात सुरू असलेल्या ६१ व्या पुरुष व महिला राज्य अजिंक्यपद खो-खो स्पर्धेत अंतिम फेरीचे चित्र स्पष्ट झाले असून महिला गटात धाराशिव विरुद्ध पुणे तर पुरुषांमध्ये पुणे विरुद्ध मुंबई उपनगर यांच्यात विजेतेपदासाठी लढत रंगणार आहे. चारही संघांमध्ये आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय स्तरावरील खेळाडूंचा भरणा असल्याने हे अंतिम सामने कमालीचे चुरशीचे होण्याची अपेक्षा आहे.



**महिला उपांत्य फेरीत धमाकेदार खेळाची झलक धाराशिवने उडवला नाशिकचा धुव्वा**

महिला गटातील पहिल्या उपांत्य सामन्यात धाराशिवने नाशिकचा एक डाव व १० गुणांनी (२६-१६) धुव्वा उडवत रुबाबात अंतिम फेरी गाठली. धाराशिवकडून संध्या सुरवसे (३.१० मि. संरक्षण), अश्विनी शिंदे (२.३० मि. संरक्षण व ४ गुण), मैथिली पवार (२ मि. संरक्षण व २ गुण) यांनी संघाच्या विजयात धमाकेदार खेळी करत उल्लेखनीय मोठा विजय साजरा करत प्रेक्षकांना जागेवर खिळवून ठेवले. तर पराभूत नाशिककडून ज्योती मेढेने चांगली कामगिरी केली.

**पुण्याची ठाण्यावर निसटती मात**

महिला गटातील दुसऱ्या उपांत्य सामन्यात पुण्याने ठाण्याचा ३ गुण व ५० सेकंद राखून (३२-२९) निसटता पराभव करत अंतिम फेरीत प्रवेश केला. दोन्ही डावांत ड्रीम रनच्या जोरावर पुण्याने ४ गुण मिळवत आघाडी घेतली, तर ठाण्याला केवळ १ ड्रीम रन गुणावर समाधान मानावे लागले. पुण्याकडून श्वेता नवले (२.२४ मि. संरक्षण), प्रियांका इंगळे (१.३० व २.०४ मि. संरक्षण व १० गुण), श्वेता वाघ (१.१४ मि. संरक्षण व ४ गुण), अपर्णा वर्धे (नाबाद १.३० व १.१६ मि. संरक्षण व २ गुण) यांनी निर्णायक खेळी करताना अंतिम फेरीची दारे उघडली तर पराभूत ठाण्याकडून रेश्मा राठोड (२.२० व १.३२ मि. संरक्षण व ४ गुण), प्रियांका भोपी (१.२० व १.०३ मि. संरक्षण) यांनी झुंजार खेळ करताना विजयाची पराकाष्टा केली मात्र त्या अपयशी ठरल्या.

**पुरुष उपांत्य फेरीत शेवटपर्यंत जुगलबंदी पुण्याचा धाराशिववर थरारक विजय**

पुरुष गटातील पहिल्या उपांत्य सामन्यात पुण्याने धाराशिववर १.१० मिनिटे राखून ४ गुणांनी (३७-३३) मात करत अंतिम फेरीत प्रवेश केला. चुरशीचा ठरलेला हा सामना प्रेक्षकांच्या हृदयाचे ठोके क्षणाक्षणाला वाढवत होते. पुण्याकडून शुभम थोरात (१.४५, २.३० मि. संरक्षण व ४ गुण), प्रतीक वाईकर (१.३०, १.३० व १.४० मि. संरक्षण व ८ गुण), सुयश गरगटे (१.००, १.३० मि. संरक्षण व २ गुण), रुद्र थोपटे (८ गुण) यांनी उत्कृष्ट खेळ करताना अंतिम फेरीत पोहचले तर पराभूत धाराशिवकडून विजय शिंदे (१.३०, १.०२ मि. संरक्षण व ४ गुण), श्री पेठे (१.२०, १.०२ मि. संरक्षण व ४ गुण) यांनी झुंजार लढत दिली.

**मुंबई उपनगरची सांगलीवर निर्णायक बाजी**

दुसऱ्या उपांत्य सामन्यात मुंबई उपनगरने सांगलीचा ३ मिनिटे ३७ सेकंद राखून २ गुणांनी (३६-३४) पराभव केला. उपनगरकडून अक्षय भांगरे (२.१० व १.१० मि. संरक्षण), अनिकेत चेंदवणेकर (१.३०, १.१० मि. संरक्षण व ८ गुण), प्रतीक देवरे (१० गुण), निहार दुबळे (१, १.०६ मि. संरक्षण व २ गुण) यांनी अष्टपैलू खेळ करत अंतिम फेरीचे दार ठोठावले तर पराभूत सांगलीकडून अक्षय मासाळ (१.०८ व १.३४ मि. संरक्षण व ४ गुण), अभिषेक केरीपाळे (१.१० मि. संरक्षण व ८ गुण) यांनी चमकदार कामगिरी नोंदवली.

**अंतिम लढतीकडे लक्ष**

महिलांमध्ये धाराशिव विरुद्ध पुणे तर पुरुषांमध्ये पुणे विरुद्ध मुंबई उपनगर या अंतिम लढतीकडे क्रीडारसिकांचे लक्ष लागले असून बीडमध्ये खो-खोचा अंतिम थरार शिगेला पोहोचला आहे.

# वारंवार पायात गोळे येत असतील तर व्हा सावध, या आजाराचे असू शकतील संकेत

हाता-पायातील स्नायूंमध्ये अचानक तीव्र वेदनेसह गोळे ( क्रॅम्प ) येण्याचे प्रमाण आजकल वाढले आहे. बदलती लाईफस्टाईल, चुकीचा आहार, एका ठिकाणी तासनतास बसून काम करणे, शरीराला जास्त आराम देणे यामुळे गोळे येण्याचे प्रमाण वाढ शकते. अनेकजण याला थकवा किंवा चालणे किंवा फिरणे कमी केल्याने होणारा त्रास समजून दुर्लक्ष करतात. परंतू वारंवार क्रॅम्प येणे ही समस्या होत असेल आणि खास करुन रात्रीच्या वेळी कोणतेही जास्त काम न करता जर हा त्रास होत असेल तर ही सामान्य समस्या नसते. त्यासाठी वेळीच आजार ओळखणे गरजेचे असते.अनेक हेल्थ एक्सपर्ट्सच्या मते वारंवार मसल्स क्रॅम्प येत असतील तर ही शरीरातील आवश्यक पोषक तत्वांची कमतरता असू शकते. नसांचा त्रास आणि ब्लड सर्क्युलेशन संबंधीत गंभीर समस्या असू शकते. चला तर पाहूयात जर तुम्हाला ही वारंवार क्रॅम्प होत असतील तर खालील आजाराचे संकेत होऊ शकतील.

**कॅल्शियम संबंधित असू शकतात आजार ?**

कॅल्शियम शरीरासाठी आवश्यक मिनरल आहेत. जे हाडे आणि दांतांना मजबूत ठेवण्यासोबत मासंपेशी आणि नसांचे काम योग्य करण्यात भूमिका निभावते. चुकीचा आहार, डेअरी प्रोडक्ट्स आणि हिरव्या भाज्यांची कमतरतेसह कोवळे ऊन्हाची कमतरता अनेकजण कॅल्शियमची कमीची शिकार होऊ शकते. याची कमतरता झाल्याने स्नायूत वारंवार क्रॅम्प्स हाडांमध्ये वेदना, कमजोरी आणि थकव्यां सारखी लक्षण दिसू शकतात.



**इलेक्ट्रोलाइट इंबॅलन्स देखील मोठे कारण**

शरीरात सोडियम, पोटॅशियम, कॅल्शियम आणि मॅग्नेशियम सारखे इलेक्ट्रोलाइट्सचे संतुलन बिघडल्यानंतर स्नायू नीट काम करत नाहीत. जास्त घाम येणे, उल्टी-जुलाब, कमी पाणी पिणे, गरजेपेक्षा जास्त चहा -कॉफी पिल्याने संतुलन बिघडते. खास करुन मॅग्नेशियम, पॉटेशियमच्या कमतरतेने हातापायात क्रॅम्पची समस्या वाढते.

**विटामिन डी आणि बी - १२ ची कमरता**

विटामिन्स डी शरीरात कॅल्शियमच्या शोषणात मदत करते.याच्या कमतरतेने हाडे कमजोर होऊ लागतात. आणि स्नायूत वेदना आणि गोळे येण्याच्या तक्रारी वाढतात. तसेच विटामिन्स बी - १२ च्या कमतरतेने नसांना प्रभावित करते. ज्यामुळे हात किंवा पायात झिणझिण्या येणे, सुन्नपणा आणि मसल्स क्रॅम्प सारखी लक्षणे नजरेस येतात.

**नसा आणि ब्लड सर्क्युलेशन संदर्भात त्रास**

अनेकदा पायापर्यंत रक्त पोचवणाऱ्या नसांतील अडथळे आणि संकुचनामुळे चालणे- फिरणे, एक्सरसाईज दरम्यान मासंपेशीत वेदना आणि गोळे येतात. याशिवाय डायबिटीज संबंधित नर्व्ह समस्या वा माकड हाडांवरील दबावाची स्थिती वा वारंवार क्रॅम्प येऊ शकतात.

**क्रॅम्पपासून आराम मिळण्यासाठी काय करावे ?**

जर क्रॅम्पमुळे सोबत सातत्याने थकवा, हाडांमध्ये वेदना, हाता पायात मुंग्य वा झिणझिण्या येत असतील, नखे कमजोर होत असतील याकडे दुर्लक्ष करु नये. ही लक्षणे गंभीर कमतरता किंवा आजाराकडे इशारा करतात. त्यामुळे वेळीच डॉक्टरांकडून उपचार घ्यावेत. तसेच क्रॅम्प आला तर त्या प्रभावित भागाला स्ट्रेच करावे. हलका मसाज करावा किंवा गरम पाण्याने शेकावे. याशिवाय डाएटमध्ये कॅल्शियम, विटामिन डी, प्रोटीन आणि इलेक्ट्रोलाईट भूरपूर असलेल्या अन्न पदार्थांचा समावेश करावा. पाणी पुरेशा प्रमाणात प्यावे.

# तळोदा पालिकेत राष्ट्रवादीचा 'घड्याळ'चा गजर; सत्ताधारी भाजपचा प्रभावाचा धक्का, राष्ट्रवादीच्या भाग्यश्री चौधरी नगराध्यक्षपदी

दैनिक वादळ वार्ता
**नंदुरबार । दिपक गोसावी**

तळोदा नगरपालिकेच्या अत्यंत प्रतिष्ठेच्या ठरलेल्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) पक्षाने ऐतिहासिक विजय मिळवत सत्ताधारी भारतीय जनता पक्षाचा दारूण पराभव केला आहे. नगरपालिकेच्या २१ जागांपैकी ११ जागांवर विजय मिळवून राष्ट्रवादीने निर्विवाद बहुमत प्राप्त केले असून, नगराध्यक्षपदी राष्ट्रवादीच्या श्रीमती भाग्यश्री योगेश चौधरी यांची ४,४७३ मतांच्या मोठ्या मताधिक्याने निवड झाली आहे.

**नगराध्यक्ष पदासाठी चुरस: भाजप तिसऱ्या क्रमांकावर:**–लोकनियुक्त नगराध्यक्ष आणि १० प्रभागांमधील २१ जागांसाठी २ डिसेंबर रोजी मतदान पार पडले होते. मतमोजणीच्या पहिल्या फेरीपासूनच राष्ट्रवादीच्या उमेदवार भाग्यश्री चौधरी यांनी मोठी आघाडी घेतली होती. पाचव्या फेरीअखेर त्यांनी भाजपचे उमेदवार जितेंद्र सूर्यवंशी यांच्यावर ३,००० मतांची आघाडी घेतली होती. अंतिम निकालानंतर भाग्यश्री चौधरी ४,४७३ मतांनी विजयी ठरल्या. तर सत्ताधारी भाजपचे जितेंद्र सूर्यवंशी या लढतीत दुसऱ्या क्रमांकावर राहिले तर शिवसेनेचे हितेंद्र क्षत्रिय तिसऱ्या क्रमांकावर राहिले,

**पक्षीय बलाबल: राष्ट्रवादीचे वर्चस्व:**–नगरसेवक पदाच्या २१ जागांपैकी राष्ट्रवादीने ११ जागा जिंकून पालिकेवर आपले वर्चस्व निर्माण केले आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेने ६ जागांवर मुसंडी मारली आहे, तर सत्ताधारी भाजपला केवळ ४ जागांवर समाधान मानावे लागले आहे.

**दिग्गजांना धक्का; नव्या दमाचे १४ उमेदवार विजयी:**–या निवडणुकीत अनेक दिग्गज नेत्यांचे राजकीय भवितव्य पणाला लागले होते. विद्यमान लोकनियुक्त नगराध्यक्ष अजय परदेशी यांनी प्रभाग ३ ब मधून विजय मिळवला. तसेच माजी नगराध्यक्षा रत्ना चौधरी यांनी प्रभाग ७ मधून पुन्हा बाजी मारली आहे. तर माजी नगराध्यक्षा हेमलता डामरे यांना प्रभाग २ मध्ये तिसऱ्या क्रमांकाच्या मतांनी पराभवाचा धक्का सहन करावा लागला. भाजपचे शहराध्यक्ष गौरव वाणी यांनाही पराभवाचा सामना करावा लागला.



**शहरातील जनतेने विकासाभिमुख राजकारणाला पसंती देऊन राष्ट्रवादी काँग्रेसवर विश्वास टाकला आहे. वरिष्ठ नेत्यांच्या मार्गदर्शनाखाली मी तळोदा शहराच्या सर्वांगीण विकासासाठी आणि नागरिकांच्या प्रश्नांसाठी सदैव कटिबद्ध राहीन. – भाग्यश्री योगेश चौधरी (नवनियुक्त नगराध्यक्ष, तळोदा)**

**नवे चेहरे::**–शहरातील मतदारांनी यंदा १४ नवीन चेहऱ्यांना संधी दिली असून, यात राष्ट्रवादीच्या सदस्यांची संख्या अधिक आहे.

**आमदारांची प्रतिष्ठा पणाला; मंत्र्यांची घोषणाही ठरली निष्फळ:**–तळोदा पालिकेची निवडणूक संपूर्ण जिल्ह्यात चर्चेचा विषय ठरली होती. भाजप आमदार राजेश पाडवी, शिवसेनेचे आमदार आमश्या पाडवी आणि चंद्रकांत रघुवंशी या तीनही दिग्गज नेत्यांनी शहरात ठाण मांडून प्रचार केला होता. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांनी सभा घेऊन 'तळोदा शहर दत्तक घेण्याची' घोषणा केली होती, मात्र मतदारांनी नवख्या राष्ट्रवादीला कौल देत या मोठ्या घोषणांना नाकारल्याचे दिसून आले.

**प्रशासनाचे ढिसाळ नियोजन:**–स्थानिक प्रशासकीय मध्यवर्ती इमारतीत झालेली मतमोजणी प्रशासनाच्या ढिसाळ नियोजनामुळे चर्चेत राहिली. केवळ ५५ टपाल मते मोजण्यासाठी तब्बल एक तास खर्च झाला. ईव्हीएम मधील मतमोजणीलाही साडेतीन तास लागल्याने उमेदवारांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. निवडणूक निर्णय अधिकारी दीपक धिवरे आणि सहायक अधिकारी विक्रम जगदाळे यांनी ही प्रक्रिया पूर्ण केली, तर पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.

# कंधार नगरपालिकेत आगळा–वेगळा निकाल माजी आमदारांच्या सुनबाईंना पराभूत करत मयुर नळदकर यांचा १५० मतांनी दणदणीत विजय

दैनिक वादळ वार्ता
**कंधार । राजकुमार पिल्लोळे**

महाराष्ट्रातील नगरपालिकांच्या निवडणुकांमध्ये अनेक ठिकाणी चुरशीचे सामने पाहायला मिळत असताना नांदेड जिल्ह्यातील कंधार नगरपालिकेत एक आगळा–वेगळा आणि लक्षवेधी निकाल लागला आहे. कंधार नगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक १ (ब) मधून एका सामान्य कुटुंबातील कार्यकर्ता मयुर नळदकर यांनी माजी आमदारांच्या सुनबाईंना तब्बल १५० मतांनी पराभूत करत दणदणीत विजय मिळवला आहे.

या विजयामुळे कंधार शहरासह संपूर्ण जिल्ह्यात राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले आहे. मयुर नळदकर हे अत्यंत साधी राहणीमान असलेले, सामान्य कुटुंबातील सामान्य कार्यकर्ते असून त्यांनी थेट जनतेशी संपर्क, सातत्यपूर्ण काम आणि विश्वासाच्या बळावर हा ऐतिहासिक विजय संपादन केला आहे.प्रभाग क्रमांक १ (ब) मधील भिमगड नगर, एकनाथ नगर, व्यंकटेश नगर व वाहतूक नगर या भागांतील नागरिकांनी मयुर नळदकर यांच्यावर विश्वास टाकत त्यांना विजयी केले.



निकाल जाहीर होताच समर्थकांनी जल्लोष केला.विजयानंतर मयुर नळदकर यांनी श्री स्वामी समर्थ महाराज मंदिरात जाऊन दर्शन घेतले व विजयाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. त्यानंतर काढण्यात आलेल्या विजय मिरवणुकीत त्यांनी नागरिकांशी संवाद साधत मतदारांचे आभार मानले.यावेळी बोलताना मयुर नळदकर म्हणाले,

मला तुम्ही निवडून दिले, याचा मला अभिमान आहे. मी दिलेला शब्द पाळणार आहे. आपल्या प्रभागात लाईट, पाणी, रस्ते, मंदिरे तसेच इतर मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रामाणिकपणे काम करणार आहे. प्रभागाचा सर्वांगीण विकास हाच माझा ध्यास असेलया विजयामागे मतदारांचा विश्वास तर आहेच, मात्र श्री स्वामी समर्थ महाराजांचे आशीर्वाद आणि सेवा जनशक्ती पार्टीचे पक्षप्रमुख प्रा. मनोहर धोंडे सरांचे मार्गदर्शन, सहकार्य व आशीर्वाद यामुळेच हा विजय शक्य झाला असल्याचेही त्यांनी नमूद केले.

एका सामान्य कार्यकर्त्याने ताकदवान राजकीय पार्श्वभूमी असलेल्या उमेदवाराला पराभूत केल्याने हा निकाल लोकशाहीतील जनशक्तीचा विजय मानला जात असून, येणाऱ्या काळात कंधार नगरपालिकेच्या राजकारणात नवे पर्व सुरू होईल, अशी चर्चा नागरिकांमध्ये होत आहे.

# अंबाजोगाई नगराध्यक्ष पदावर नंदकिशोर मुंदडांची निवड; केज तालुका भाजपातर्फे जंगी स्वागत!

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

अंबाजोगाई नगर परिषद च्या नवनिर्वाचित नगराध्यक्षपदी ज्येष्ठ नेते नंदकिशोर (काकाजी) मुंदडा यांची निवड झाल्या बद्दल केज तालुका भारतीय जनता पक्षाच्या वतीने त्यांचे उत्साहात अभिनंदन करण्यात आले.आमदार नमिताताई मुंदडा यांच्या प्रमुख उपस्थितीत हा सत्कार सोहळा पार पडला.

**विकासाच्या 'मुंदडा पॅटर्न'वर शिक्कामोर्तब**
नंदकिशोर मुंदडा यांच्या प्रदीर्घ अनुभवाचा आणि दूरदृष्टीचा फायदा अंबाजोगाई शहराच्या विकासाला होईल,असा विश्वास याप्रसंगी व्यक्त करण्यात आला.आमदार नमिताताई मुंदडा यांच्या मार्गदर्शनाखाली मुंदडा परिवाराने जनसेवेचा जो वारसा जपला आहे त्याला या विजयाने अधिक बळ मिळाले आहे.यावेळी मान्यवरांची उपस्थिती होती.यावेळी केज तालुक्यातील भाजपाचे प्रमुख पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी काकाजींचे अभिनंदनकेले.डॉ.वासुदेव नेहरकर (जिल्हाध्यक्ष, वैद्यकीय आघाडी), भगवान केदार (भाजपा केज तालुका अध्यक्ष), सुरज भैया घुले (युवानेते),



महादेव सूर्यवंशी (अध्यक्ष, व्यापारी महासंघ),प्रकाश मुंडे (ज्येष्ठ पत्रकार), अरुण चाटे,सदाशिव चाटे,शिवाजी चाटे, शिवाजी पाटील,चंदुलाल मिसाळ यासोबतच महादेव जाधवर,बाबा चौरे मामा,विक्रम डोईफोडे, किसन कदम,विकास जाधव, गोरख मोराळे यांच्यासह मोठ्या संख्येने मान्यवर आणि कार्यकर्ते उपस्थित होते.काकाजी यांच्या निवडीमुळे अंबाजोगाईच्या विकासाला नवी गती मिळेल.हा विजय सर्व सामान्य कार्यकर्त्यांचा आणि जनतेच्या विश्वासाचा विजय आहे अशी भावना यावेळी उपस्थित पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केली.घोषणा देत विजयाचा गुलाल उधळत आनंदोत्सव साजरा करण्यात आला.

# मराठवाडा विभागीय अबॅकस स्पर्धेत रुद्रम अबॅकस बर्दापूरच्या विद्यार्थ्यांचे घवघवीत यश

दैनिक वादळ वार्ता
**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

बीड येथील समर्थ लॉन्स येथे पार पडलेल्या मराठवाडा विभागीय अबॅकस स्पर्धेत अंबाजोगाई तालुक्यातील बर्दापूर येथील रुद्रम अबॅकसच्या विद्यार्थ्यांनी पहिल्याच सहभागात दैदीप्यमान यश संपादन करत आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे.या स्पर्धेत रुद्रम अबॅकसच्या विद्यार्थ्यांनी विविध गटांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करत पहिला, दुसरा,तिसरा तसेच चौथा क्रमांक पटकावला. वेगवान गणनाशक्ती, अचूकता,एकाग्रता आणि आत्मविश्वासाच्या जोरावर विद्यार्थ्यांनी परीक्षकांसह उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले.

या उल्लेखनीय यशामुळे रुद्रम अबॅकस,बर्दापूर हे केंद्र अल्पावधीतच मराठवाड्यात गुणवत्तेचे प्रतीक ठरले असून विद्यार्थ्यांची सातत्यपूर्ण मेहनत,शिक्षकांचे मार्गदर्शन आणि संस्थेची शिस्तबद्ध प्रशिक्षणपद्धती यांचे हे यशस्वी फलित असल्याचे मान्यवरांनी व्यक्त केले.विद्यार्थ्यांचा विशेष सत्कार सोहळा उत्साहात पार पडला. कार्यक्रमात गिरीश करडे, मणियार तसेच मास्टर ट्रेनर तेजस्विनी सावंत यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना ट्रॉफी,गोल्ड




मेडल व अबॅकसची मानचिन्हे प्रदान करण्यात आली. रुद्रम अबॅकस,बर्दापूरच्या संचालिका संध्याराणी जाधव तसेच शिक्षकवृंद यांनी विद्यार्थ्यांना नियमित सराव,मानसिक तयारी आणि योग्य मार्गदर्शन दिले.त्यांच्या अथक परिश्रमांमुळे यंदा रुद्रम केंद्राला 'उत्कृष्ट केंद्र' हा मान मिळाला असून या केंद्रातील सर्व विद्यार्थ्यांची राष्ट्रीय अबॅकस स्पर्धेसाठी निवड झाल्याची माहिती आयोजकांनी दिली.

या स्पर्धेत रुद्रम जाधव, ईश्वरी भोसले,अपेक्षा सूर्यवंशी यांनी ट्रॉफी जिंकत विशेष यश मिळवले,तर किशोरी सिरसाठ,कुणाल सिरसाठ,स्वरूप कांबळे, शाहनवाज देशमुख यांनी गोल्ड मेडल मिळवून केंद्राच्या यशात भर घातली आहे.स्पर्धेदरम्यान प्रेमला भोसले,श्रीदेवी सिरसाठ,किशोर भोसले, परमेश्वर सूर्यवंशी यांची उपस्थिती लाभली असून पालकांनी विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल समाधान व्यक्त करत शिक्षक,प्रशिक्षक व संस्थेच्या कार्याचे विशेष कौतुक केले.

**शुभेच्छांचा वर्षाव**
सरस्वती न्यू मॉडर्न इंग्लिश स्कूल,बर्दापूरचे मुख्याध्यापक श्री.मधुकर जाधव यांनी रुद्रम अबॅकसच्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत सांगितले की,पहिल्याच प्रयत्नात मिळालेले हे यश अत्यंत अभिमानास्पद असून विद्यार्थ्यांची मेहनत, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि संस्थेची गुणवत्ता याचे उत्तम उदाहरण आहे.त्यांनी विद्यार्थ्यांना राष्ट्रीय स्पर्धेसाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या आहेत. सरस्वती शाळेचे संस्था अध्यक्ष श्री.ताराचंद शिंदे यांनी ग्रामीण भागातून घडणारी गुणवत्ता प्रेरणादायी असल्याचे नमूद करत रुद्रम अबॅकस ने शिक्षण क्षेत्रात नवा आदर्श निर्माण केला असल्याचे सांगून विद्यार्थ्यांच्या पुढील वाटचालीस मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या आहेत.

श्री रेणुका प्राथमिक शाळा,बर्दापूरचे मुख्याध्यापक श्री.रमेश शिनगारे यांनी अबॅकस सारख्या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांची गणनाशक्ती, स्मरणशक्ती आणि आत्मविश्वास वाढतो असे सांगितले,तसेच या यशामुळे परिसरातील इतर विद्यार्थ्यांनाही प्रेरणा मिळेल,असे मत व्यक्त केले आहे.विवेक ज्ञान मंदिर,बर्दापूरचे मुख्याध्यापक श्री. चंद्रकांत इगवे यांनी पहिल्याच सहभागात मिळालेले हे दैदीप्यमान यश कौतुकास्पद असल्याचे सांगून रुद्रम अबॅकसचे सर्व विद्यार्थी, संचालिका संध्याराणी जाधव व शिक्षकवृंद यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले व राष्ट्रीय पातळीवरही हे विद्यार्थी यशाचा झेंडा फडकावतील,असा विश्वास व्यक्त केला आहे.

# मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज कार्यक्रमांतर्गत सुखापूरी येथे जेष्ठ नागरिकांचा गौरव

दैनिक वादळ वार्ता
**अंबड । प्रतिनिधी**

अंबड तालुक्यातील सुखापूरी येथील ग्रामपंचायत कार्यालयात महाराष्ट्र शासनाच्या मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज या महत्वाकांक्षी कार्यक्रमांतर्गत गावातील जेष्ठ नागरिकांचा सन्मान सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला.

या कार्यक्रमात सुखापूरी येथील सामाजिक, सांस्कृतिक व ग्रामविकासासाठी मोलाचे योगदान देणाऱ्या माजी सरपंच बाबुराव घनश्याम शिंदे, गीताबाई चांगले, जिजाभाऊ शिंदे यांच्यासह इतर जेष्ठ नागरिकांचा ग्रामपंचायतच्या वतीने शाल व श्रीफळ देऊन यथोचित सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमास ग्रामसेवक के. के. कल्याणकर, सरपंच भगवानराव राखुंडे, अंबड पंचायत समितीचे माजी उपसभापती रईस बागवान, तसेच सुरेश लहुटे, गजानन शिंदे, मदन कोकाटे, ज्ञानदेव चांगले आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी जेष्ठ नागरिकांचे समाजातील योगदान अधोरेखित करताना, त्यांचा अनुभव व मार्गदर्शन हे गावाच्या सर्वांगीण विकासासाठी प्रेरणादायी असल्याचे मत व्यक्त केले.

मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज कार्यक्रमाच्या माध्यमातून गावपातळीवर लोकसहभाग, सामाजिक बांधिलकी व सन्मानाची संस्कृती अधिक बळकट होत असल्याचेही यावेळी सांगण्यात आले.या सत्कार सोहळ्यास सुखापूरी गावातील नागरिकांनी मोठ्या



संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. कार्यक्रमाचे आयोजन व यशस्वी अंमलबजावणी ग्रामपंचायत सुखापूरीच्या वतीने करण्यात आली.

# अहिल्यानगरमध्ये उच्च पेन्शनचा लाभ मिळण्यासाठी संघटना प्रयत्नशील

दैनिक वादळ वार्ता
**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

शहरातील जिल्हा सहकारी बँकेच्या पद्मश्री विखे पाटील सभागृहात बँकेच्या सेवा निवृत्त कर्मचाऱ्यांसाठी उच्च पेन्शन (ईपीएस–९५) संदर्भात सविस्तर मार्गदर्शनपर सभा उत्साहात पार पडली. राष्ट्रीय संघर्ष समिती ईपीएस–९५ यांच्या वतीने या सभेचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीस जिल्ह्यातील तसेच परिसरातील मोठ्या संख्येने सेवानिवृत्त बँक कर्मचारी व पेन्शनधारक उपस्थित होते.या मार्गदर्शन सभेला राष्ट्रीय संघर्ष समितीचे पश्चिम भारत संघटक सुभाषराव पोखरकर, महाराष्ट्र प्रमुख अजित घाडगे, उत्तर महाराष्ट्र प्रमुख देवीसिंग जाधव (अण्णा), पश्चिम महाराष्ट्र प्रमुख इंदरसिंग जाधव, महिला आघाडीच्या उपाध्यक्ष आशाताई शिंदे, जिल्हा बँकेचे जनरल मॅनेजर जयंत देशमुख, जिल्हा कार्याध्यक्ष टी.एस. उर्फ बाळासाहेब देशमुख, जिल्हाध्यक्ष संपत समिंदर, दहिफळे, बाबुराव दळवी, प्रकाश गायके आदी मान्यवर उपस्थित होते.सभेत १ सप्टेंबर २०१४ नंतर सेवानिवृत्त झालेल्या ईपीएस–९५ पेन्शनधारकांच्या विविध प्रश्नांवर सखोल चर्चा झाली. उपस्थित सेवानिवृत्तांनी उच्च पेन्शन संदर्भातील अडचणी, ईपीएफओकडे दिलेल्या जॉइंट ऑप्शन फॉर्म्सची स्थिती, नाकारलेले अर्ज तसेच कोणतीही माहिती न मिळालेल्या प्रकरणांबाबत प्रश्न उपस्थित केले. यावेळी सुभाषराव पोखरकर, अजित घाडगे, देवीसिंग जाधव (अण्णा) आणि दहिफळे यांनी कायदेशीर तरतुदी, सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयांचा आधार, तसेच ईपीएस–९५ अंतर्गत उच्च पेन्शन मिळविण्याची प्रक्रिया सविस्तरपणे स्पष्ट केली. यावेळी मार्गदर्शन करताना सुभाषराव पोखरकर यांनी सांगितले की, ज्यांनी जॉइंट ऑप्शन फॉर्म्स ईपीएफओकडे सादर केले आहेत, ज्यांना ते नाकारल्याचे कळविण्यात आले आहे, तसेच ज्यांना अद्याप कोणतीही सूचना मिळालेली नाही, असे सर्व कर्मचारी उच्च पेन्शनसाठी पात्र आहेत. त्यांनी सातारा जिल्हा बँकेतील सुमारे ५०० सेवा निवृत्त कर्मचाऱ्यांना नुकताच उच्च पेन्शनचा लाभ मिळाल्याचे उदाहरण




देत अहिल्यानगर जिल्ह्यातील सेवानिवृत्तांनाही हा लाभ निश्चितपणे मिळू शकतो, असा विश्वास व्यक्त केला. या प्रसंगी जिल्हा सहकारी बँकेचे जनरल मॅनेजर जयंत देशमुख यांनी सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना आश्वस्त करत सांगितले की, उच्च पेन्शनच्या प्रकरणात जिल्हा बँक सर्वतोपरी सहकार्य करेल. यासाठी संबंधित ईपीएस–९५ पेन्शनधारकांनी उच्च पेन्शनसाठीचे आपले अर्ज व आवश्यक कागदपत्रे बँकेत पुढील कार्यवाहीसाठी सादर करावीत, असा निर्णय यावेळी घेण्यात आला. बँक प्रशासन आणि संघटना यांच्या समन्वयातून प्रलंबित प्रकरणांचा पाठपुरावा करण्यात येणार असल्याचेही स्पष्ट करण्यात आले.कार्यक्रमाचे आयोजन टी.एस. उर्फ बाळासाहेब देशमुख यांच्या पुढाकारातून करण्यात आले. त्यांनी स्वागत व पाहुण्यांचा परिचय करून दिला. बैठकीसाठी सभागृह उपलब्ध करून दिल्याबद्दल संघटनेच्या वतीने बँकेचे कार्यकारी संचालक वर्पे व जनरल मॅनेजर जयंत देशमुख यांचे आभार मानण्यात आले.

# शिर्डीवर भाजपचे निर्विवाद वर्चस्व; सुजय विखेंच्या नेतृत्वाखाली 'कमळ' फुलले,जयश्री थोरात नगराध्यक्षपदी!

## शिर्डी नगरपरिषदेचा निकाल: 'चेहऱ्यांपेक्षा कामाला महत्त्व' ; विखे पाटलांच्या नेतृत्वावर शिर्डीकरांचा विश्वास!

दैनिक वादळ वार्ता

**शिर्डी | प्रतिनिधी**

शिर्डी नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ च्या निकालाने शहराच्या राजकारणात एका नव्या पर्वाची सुरुवात केली आहे. भारतीय जनता पार्टीने (भाजप) नगराध्यक्ष पदासह बहुसंख्य जागांवर ऐतिहासिक विजय मिळवत नगरपरिषदेवर आपले वर्चस्व प्रस्थापित केले आहे. हा विजय डॉ. सुजय विखे पाटील यांच्या सक्षम नेतृत्वावर जनतेने दिलेली मोहोर असल्याची चर्चा आता राजकीय वर्तुळात रंगू लागली आहे.

**नगराध्यक्ष पदावर भाजपचा झेंडा,**

अत्यंत चुरशीच्या ठरलेल्या नगराध्यक्ष पदाच्या निवडणुकीत भाजपच्या उमेदवार सौ. जयश्री विष्णू थोरात यांनी १२,६१० मते मिळवून दणदणीत विजय संपादन केला. त्यांनी आपल्या निकटतम प्रतिस्पर्धी आरणे कल्याणी विठ्ठल (७,६७० मते) यांचा मोठ्या मताधिक्याने पराभव केला. या पदासाठी एकूण २५,२६३ वैध मते नोंदवली गेली होती.

**प्रभागनिहाय विजयी उमेदवारांची यादी:**

निवडणूक निर्णय अधिकारी माणिक आहेर यांनी जाहीर केल्यानुसार, विविध प्रभागांतून खालील उमेदवार वैधरित्या निवडून आले आहेत:

* प्रभाग १: श्रीमती त्रिभुवन सुनिता मंगेश (भाजप – जागा १ अ) आणि कोते निलेश मुकुंदराव (राष्ट्रवादी काँग्रेस – जागा १ ब) विजयी.
* प्रभाग २: गोंदकर सतीश गोविंदराव (अपक्ष – जागा २ अ) आणि गोंदकर सुनिता वसंत (शिवसेना – जागा २ ब) यांनी बाजी मारली.
* प्रभाग ३: शिवसेनेचे वर्चस्व राहिले असून ठाकरे बापू पांडुरंग (जागा ३ अ) आणि कोते आशाबाई कमलाकर (जागा ३ ब) विजयी झाले आहेत.
* प्रभाग ४: या प्रभागात भाजपचे पूर्ण वर्चस्व राहिले. बर्डे गायत्री राजेंद्र (जागा ४ अ) आणि कोते नितीन उत्तमराव (जागा ४ ब) विजयी झाले.
* प्रभाग ५: भाजपच्या विद्या श्याम जाधव (शेजवळ) (जागा ५ अ) आणि शेळके पाटील अभय दत्तात्रय (जागा ५ ब) यांनी विजय मिळवला.
* प्रभाग ६: भाजपचे गायकवाड सचिन सिताराम (जागा ६ अ) आणि बोऱ्हाडे कोमल किरण (जागा ६ ब) विजयी झाले.
* प्रभाग ७: अपक्ष उमेदवारांनी मुसंडी मारली. सोनवणे सरिता गणेश (जागा ७ अ) आणि शेळके अमित कैलास (जागा ७ ब) हे अपक्ष उमेदवार विजयी ठरले.
* प्रभाग ८: भाजपचे रविंद्र पांडुरंग गोंदकर विजयी झाले. आणि सौ. छाया पोपट शिंदे (अपक्ष) बिनविरोध निवड झाली.
* प्रभाग ९: राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीने या प्रभागात आपली ताकद दाखवली. गोतीस अलका वाल्मिक (जागा ९ अ) आणि गोंदकर दिपक रमेश (जागा ९ ब) विजयी झाले.




* प्रभाग १०: भाजपचे वर्चस्व कायम राहिले. कोते वैशाली दत्तात्रय (जागा १० अ) आणि कोते नितीन पाराजी (जागा १० ब) विजयी झाले.
* प्रभाग ११: या प्रभागातील तिन्ही जागांवर भाजपचे उमेदवार शिंदे छाया सुधीर (जागा ११ अ), कोते अरविंद सुखदेव (जागा ११ ब) आणि कोते प्रतिक्षा किरण (जागा ११ क) विजयी झाले.

**दिग्गजांना धक्का, कामावर शिक्कामोर्तब,**


या निवडणुकीत भाजपला मिळालेले निर्भेळ यश हे डॉ. सुजय विखे यांच्या सूक्ष्म नियोजनाचा परिणाम मानला जात आहे. अनेक अनुभवी नेत्यांना पराभवाचा धक्का बसला असून, शिर्डीच्या जनतेने चेहऱ्यांपेक्षा कामाला महत्त्व देण्याचा स्पष्ट संदेश या निकालातून दिला आहे. या निकालामुळे जुनी राजकीय समीकरणे कोलमडली असून भाजप कार्यकर्त्यांनी शहरात गुलालाची उधळण करत मोठा जल्लोष साजरा केला. सर्व नवनिर्वाचित सदस्यांचे राजकीय, सामाजिक आणि व्यापारी वर्गातून अभिनंदन होत आहे.

# माळेगाव यात्रेत नंदकिशोर मंजुवालेचा अश्व ठरला प्रथम क्रमांकचा मानकरी

दैनिक वादळ वार्ता

**नायगाव | हनुमंत चंदनकर**

अनेक व्यक्ती अनेक प्रकारचे प्राणी पक्षी आपल्या आवडीचा छंद म्हणून पाळतात पण घोडा पाळणे हे काही सध्याच्या युगात सोपे राहिले नाही.नांदेड शहरातील नंदकिशोर अडकटलवार हे मंजूवाले या नावाने सर्वत्र परिचित आहे त्याने अनेक वर्षापासून अश्व पाळण्याचा छंद जोपासला आहे त्यांच्याकडे बगीरा नावाचा घोडा अतिशय सुंदर व चपळीचा असून नंदकिशोर मंजूवाले आणि त्यांचे चिरंजीव अभिषेक मंजूवाले यांनी सुप्रसिद्ध असलेल्या माळेगाव यात्रेतील स्पर्धेत आपला बगिरा अश्व उतरविला होता तो प्रथम क्रमांकाचा मानकरी ठरला आहे.



एक काळ असा होता की राजे महाराजे सह अनेक व्यक्तीकडे घोडे असायचे पण आज घोडा पाळणे म्हणजे एकदम जिकरीचे काम आहे एकंदरीत हे मर्दानी छंद असून नांदेड शहरातील प्रसिद्ध उद्योगपती नंदकिशोर मंजुवाले व अभिषेक मंजुवाले या पिता–पुत्रांना अश्व पाण्याचा छंद अनेक वर्षापासून आहे त्यांनी बगिरा नावाचा अश्व पाळलेला असून अभिनेता सलमान खान यांच्याकडे या बगिराचा आजोबा आहे तर आजाद फिल्ममध्ये या बगीराचा बाप आहे असेही त्यांनी पत्रकारांशी बोलताना म्हणाले. बगीरा अश्व यांची दररोज देखभाल अतिशय चांगल्या प्रकारे करीत त्यांना आहारही चांगल्या दर्जाचा दिला जातो दरवर्षीच माळेगाव येथे भरणाऱ्या या भव्य यात्रेमध्ये स्पर्धेत बगीरा उतरविला होता तो बगिरा माळेगाव यात्रेत प्रथम क्रमांकाचा ठरला असल्याने मंजुवाले यांनी ४१ हजाराचे पारितोषक देऊन सन्मानित करण्यात आले नायगाव शहरातील डॉक्टर लक्ष्मण चनावार यांनी आपले जावई अभिषेक मंजूवाले यांनी पाळलेला घोडा व सदर स्पर्धेत प्रथम क्रमांकाची बाजी मारल्याने त्यांच्याशी भेट करून दिली असता पत्रकारांशी बोलताना मंजूवाले म्हणाले की आपल्या घरी अश्व पाळल्याने घरात व्यवहारात चपळाई येते मला पूर्वीपासूनच हा अश्व पाळण्याचा खूप छंद आहे असेही ते म्हणाले.मंजुवाले यांचा अश्व माळेगाव यात्रेत प्रथम क्रमांक आला असल्याने त्यांचे सर्वत्र अभिनंदन व कौतुक होत आहे.

## अध्यात्मिक व धार्मिक क्षेत्रातील आदर्श कार्याचा गौरव

# ह.भ.प.राजू महाराज लोखंडे यांना 'गंगाई बाबाजी समाजभूषण पुरस्कार २०२५' जाहीर

दैनिक वादळ वार्ता

**आष्टी | प्रतिनिधी**

समाजातील अध्यात्मिक, धार्मिक व तर्कशास्त्रीय क्षेत्रात आगळेवेगळे व समाजोपयोगी कार्य करणारे ह.भ.प. राजू महाराज लोखंडे (श्री राजेंद्र गंगाराम लोखंडे) यांची गंगाई–बाबाजी समाजभूषण पुरस्कार २०२५ साठी निवड करण्यात आली आहे. गंगाई–बाबाजी पुरस्कार संयोजन समितीच्या वतीने हा पुरस्कार जाहीर करण्यात आला असून त्यांच्या कार्याची सर्वत्र प्रशंसा होत आहे.ग्रामीण भागातील शेतकरी कुटुंबात जन्मलेले राजू महाराज लोखंडे यांचे प्राथमिक शिक्षण दिघोळ (ता. पाटोदा) येथील जिल्हा परिषद शाळेत झाले. शालेय जीवनापासूनच अध्यात्माची ओढ असलेल्या महाराजांनी पुढे एम.ए. पर्यंत शिक्षण पूर्ण केले. पाटोदा येथे स्थायिक झाल्यानंतर त्यांनी खेमानंद महाराजांचे शिष्यत्व स्वीकारले. काही काळ



वैराग्यमूर्ती ह.भ.प.रामकृष्ण महाराज रंधवे यांच्या संस्थेत सेवा केल्यानंतर अध्यात्मिक साधनेला पूर्णतः वाहून घेतले.ब्रह्मचारी वृत्तीने जीवन जगत असताना त्यांनी तारखेच्या तर्कशास्त्रावर आधारित विलक्षण ज्ञान आत्मसात केले. कोणताही ज्योतिषशास्त्राचा औपचारिक अभ्यास न करता केवळ तर्कशक्तीच्या आधारे व्यक्तीची जन्मतारीख, वार तसेच जीवनातील संभाव्य घटना अचूकपणे सांगण्याची अद्भुत क्षमता त्यांनी प्राप्त केली आहे.त्यांच्या अनेक भाकितांचा अनुभव आजवर खरा ठरलेला असून राज्य व जिल्हा पातळीवरील अनेक राजकीय व सामाजिक अंदाज चर्चेचा विषय ठरले आहेत.विशेष म्हणजे, नैराश्यात सापडलेल्या व्यक्तींना त्यांच्या आयुष्यातील येणाऱ्या सकारात्मक क्षणांची जाणीव करून देत आत्महत्येसारख्या टोकाच्या विचारांपासून परावृत्त करण्याचे समाजकार्य महाराज सातत्याने करत आहेत. तसेच सामाजिक, अध्यात्मिक व पर्यावरण विषयक जनजागृतीचे कार्य अहोरात्र सुरू आहे.यापूर्वी त्यांना समाजरत्न पुरस्कार (१४ नोव्हेंबर २०२५) प्रदान करण्यात आला असून, आता गंगाई–बाबाजी समाजभूषण पुरस्कार २०२५ जाहीर झाल्याने त्यांच्या कार्याचा यथोचित गौरव झाला आहे.या निवडीबद्दल सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# चौसाळ्याच्या आठवडी बाजारातून १९ जणांचे मोबाईल चोरीला

## चौसाळ्याच्या ठाणे अंमलदाराचा कारभार पैसा फेको तमाशा देखो

दैनिक वादळ वार्ता

**चौसाळा | प्रतिनिधी**

बुधवार, दिनांक १७ डिसेंबर रोजी बीड तालुक्यातील चौसाळा येथील आठवडी बाजारात मोठ्या प्रमाणावर मोबाईल चोरीच्या घटना घडल्याचे समोर आले आहे. एकाच दिवशी जवळपास १९ जणांचे मोबाईल फोन चोरीस गेल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. तसेच एकाच दिवशी एवढ्या मोठ्या प्रमाणात मोबाईल चोरी होण्याची ही चौसाळा शहरातील पहिलीच घटना असून यामुळे पोलिसांच्या समोर चोरांनी एक प्रकारे आव्हानच उभे केले आहे. चौसाळा पोलिस चौकीतील ठाणे अमलदाराचा कारभार हा पैसा फेको तमाशा देखो अशा पध्दतीने सुरु असुन तक्रार दाराना देखील खुलेआमपणे पेसाची मागणी ठाणे अमलदार करत आहे अशी चर्चा होत असुन तात्काळ या ठाणे अमलदाराची बदली करण्यात यावी अशी मागणी होत आहेया चोरीच्या घटनांमध्ये हिंगणी खुर्द येथील माजी सरपंच रमेश तांदळे यांचा सुमारे १५ हजार रुपये किमतीचा, दोन महिन्यांपूर्वी खरेदी केलेला मोबाईल चोरीस गेला आहे. तसेच चौसाळा येथील रामकृष्ण मेडिकलचे संचालक निशिकांत देशमुख यांचा सुमारे ४० हजार रुपये किमतीचा, दोन महिन्यांपूर्वीच घेतलेला मोबाईलही चोरट्यांनी लंपास केला आहे. याशिवाय चांदशी दवाखान्याचे डॉक्टर हलदार यांच्यासह अनेक नागरिकांचे मोबाईल चोरीस गेल्याची घटना चौसाळा येथील आठवडी बाजारात घडली आहे.या प्रकरणी काही नागरिकांनी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली असून उर्वरित नागरिक तक्रार देण्याच्या तयारीत आहेत. एकाच दिवशी मोठ्या संख्येने मोबाईल चोरीस गेल्याने पोलिसांसमोर तपासाचे मोठे आव्हान उभे राहिले आहे. आठवडी बाजारात सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला असून नागरिकांकडून पोलीस बंदोबस्त वाढवण्याची मागणी होत आहे. तसेच चोरीला गेलेले मोबाईल शोधून द्यावेत अशी मागणी करण्यात येत आहे.

# जनतेचा कौल मान्य; राष्ट्रवादी (शरद पवार) पक्षाचे दोन नगरसेवक विजयी–दीपक देशमुख

## सौ.संध्या दीपक देशमुख यांनी तब्बल १२ हजारांहून अधिक मते

दैनिक वादळ वार्ता

**परळी | प्रतिनिधी**

परळी नगरपालिका निवडणूक ही सत्ताधारी प्रस्थापितांसाठी धक्का देणारी ठरली असून जनतेने स्पष्ट कौल देत बदलाचा संदेश दिला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार सौ. संध्या दीपक देशमुख यांनी तब्बल १२ हजारांहून अधिक मते मिळवत आपली ताकद सिद्ध केली. याचबरोबर पक्षाचे दोन नगरसेवक निवडून येणे ही या लढतीतील महत्त्वाची बाब ठरली आहे.यंदाच्या निवडणुकीत अपक्ष उमेदवारांचेही वर्चस्व दिसून आले असून अनेक अपक्ष नगरसेवक विजयी झाले. काही दिवसांपूर्वीच राष्ट्रवादी (शरद पवार) पक्षात प्रवेश केलेल्या दीपक देशमुख यांनी पक्षाचे नेते राजेभाऊ फड आणि शहरातील सर्व पदाधिकाऱ्यांना सोबत घेऊन ही निवडणूक चिवटपणे लढवली. पक्षात नव्याने आले असतानाही कमी कालावधीत त्यांनी प्रत्येक प्रभागात उमेदवार उभे करत संघटनात्मक ताकद दाखवली.परळी शहरात महायुतीकडून एक माजी मंत्री व एक विद्यमान मंत्री अशा दोन दिग्गज नेत्यांच्या विरोधात दीपक देशमुख यांनी थेट संघर्ष उभा केला. निवडणूक प्रचारादरम्यान निवडणूक अधिकाऱ्यांच्या चुका निदर्शनास आणून देत न्यायालयात हरकत दाखल करून उमेदवार पुन्हा निवडणुकीत उभा करणे, अशा अनेक निर्णायक टप्प्यांवर त्यांनी ठाम भूमिका घेतली. या संपूर्ण लढतीतून राष्ट्रवादी (शरद पवार) पक्षाला दोन नगरसेवक मिळाले.



सत्ताधारी प्रस्थापितांनी सर्व ताकद, प्रतिष्ठा आणि संसाधने पणाला लावली असतानाही राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाने परळीत ठाम आणि प्रभावी संघर्ष केला. याचा परिणाम असा की या मतदारसंघातील आमदाराला विधानसभेला मिळालेली आघाडी अर्ध्यावर येऊन ठेपली, आणि आमदारांच्या विरोधात प्रथमच ठळक ताकद उभी राहिल्याचे चित्र दिसून आले.दीपक देशमुख यांचा हा जरी पहिलाच निवडणुकीचा प्रयोग असला, तरी आजच्या निकालाने भविष्यात प्रस्थापित सत्ताधाऱ्यांसमोर मोठे आव्हान उभे राहण्याची शक्यता स्पष्ट झाली आहे. परळीच्या राजकारणात हा निकाल बदलाचा नवा अध्याय ठरणार असल्याचे राजकीय वर्तुळात बोलले जात आहे.

**महत्वपूर्ण मुद्दे**

परळी शहरात महायुतीकडून एक माजी मंत्री व एक विद्यमान मंत्री अशा दोन दिग्गज नेत्यांच्या विरोधात दीपक देशमुख यांनी थेट संघर्ष उभा केला

पक्षाचे दोन नगरसेवक निवडून येणे ही या लढतीतील महत्त्वाची बाब

यंदाच्या निवडणुकीत अपक्ष उमेदवारांचेही वर्चस्व दिसून आले

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा शहराध्यक्ष आयुब पठाण हे देखील या निवडणुकीत पराभूत झाले आहेत हे विशेष

# नवापूर नगरपालिकेत भरत गावितांचा करिष्मा; राष्ट्रवादी काँग्रेसचा ऐतिहासिक विजय, जयवंत जाधव नगराध्यक्षपदी विराजमान

दैनिक वादळ वार्ता

**नंदुरबार | दिपक गोसावी**

नवापूर नगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीत जनमताचा कौल स्पष्ट झाला असून,भरत गावित यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेसने (अजित पवार गट) विरोधकांचा धुव्वा उडवत ऐतिहासिक विजय संपादन केला आहे. भरत गावित यांचे अत्यंत विश्वासू मानले जाणारे जयवंत जाधव यांनी नगराध्यक्षपदाच्या निवडणुकीत ९,१५३ मतांच्या प्रचंड फरकाने विजय मिळवून शहरावर राष्ट्रवादीचे वर्चस्व प्रस्थापित केले आहे.

**विरोधकांचा सुपडा साफ; २३ पैकी २० जागांवर राष्ट्रवादीचा कब्जा:–** नगरपालिकेच्या ११ प्रभागांमधील एकूण २३ जागांसाठी झालेल्या या अटीतटीच्या निवडणुकीत सुरुवातीपासूनच राष्ट्रवादी काँग्रेसने (अजित पवार गट) आघाडी घेतली होती. मतमोजणीअंती या पक्षाने तब्बल २० जागांवर दणदणीत विजय मिळवला. या विजयामुळे नगरपालिकेत राष्ट्रवादीची एकहाती सत्ता आली आहे. दुसरीकडे, प्रबळ मानल्या जाणाऱ्या राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार गट) पक्षाला केवळ ०२ जागांवर, तर भारतीय जनता पक्षाला केवळ ०१ जागेवर समाधान मानावे लागले.

**भरत गावितांच्या नेतृत्वावर मोहोर–:**हा विजय भरत गावित यांच्या स्थानिक



राजकारणातील पकडीचा आणि त्यांनी केलेल्या विकासकामांचा विजय मानला जात आहे. मतदारांनी त्यांच्या शब्दावर विश्वास ठेवून ही मोठी जबाबदारी त्यांच्याकडे सोपवली आहे. विजयानंतर शहरात कार्यकर्त्यांनी गुलालाची उधळण करत आणि फटाक्यांची आतिषबाजी करत मोठा जल्लोष साजरा केला.

**विकासाला नवी गती मिळणार: जयवंत जाधव–:**नूतन नगराध्यक्ष जयवंत जाधव यांनी विजयानंतर मतदारांचे आभार मानले. ते म्हणाले की, हा विजय माझा नसून भरत गावित यांच्या मार्गदर्शनाचा आणि नवापूरच्या जनतेचा आहे. शहराच्या सर्वांगीण विकासासाठी आणि मूलभूत सोयीसुविधांसाठी आम्ही कटिबद्ध आहोत. या विजयामुळे नवापूर शहराच्या राजकारणात भरत गावित यांचे स्थान अधिकच बळकट झाले असून, आगामी काळात शहराचा चेहरामोहरा बदलण्याच्या दृष्टीने या सत्तेचा उपयोग होईल, असा विश्वास राजकीय विश्लेषकांनी व्यक्त केला आहे.



**गेवराई : नगराध्यक्षपदी विजयी झाल्यानंतर निवडणूक निर्णय अधिकारी संदीप खोमणे यांच्याकडून विजयी प्रमाणपत्र स्वीकारताना भाजपच्या नूतन गेवराई नगराध्यक्ष सौ गीता भाभी बाळराजे पवार. सोबत भाजप नेते बाळराजे पवार आणि भाजप नेते माजी राज्यमंत्री बदामराव पंडित.**

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077